6)

प्रशासन

## वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट

**अंक 37 वा**

**दिनांक-12/09/2022 ते दिनांक-16/09/2022**

**पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.**

11756 **जावक क्रमांक :- दिनांक:-** 10 OCT 2022

**( केवळ कार्यालयीन कामकाजासाठी )**

---

**भाग-01:-**

**बदली :-निरंक**

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :- निरंक**

**भाग-२ :-**

**रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आली-३/सिक हजर /नापोकॉ-१०१८/११०४६/२०२२/वाशिम दि. १२/०९/२०२२ अन्वये पोना/१०१८,प्रशांत राजगुरु नेम.स्थागुशा वाशिम यांची प्रकृती बरी नसल्यामुळे ते दि.१७/०७/०२२ रोजी पासुन आजारी रजेवर होते त्यांची तब्येत बरी झाल्याने ते आज दिनांक १२/०९/२०२२ रोजी मा.पो.अधिक्षक यांचे आंज्ञाकीत कक्षात हजर होणेस आले असता त्यांना त्यांचे विनंतीनुसार हजर करुण घेण्यात येत आहे.तसेच त्यांचा दि.०७/०७/२०२२ ते १२/०९/२०२२ पावेतो कालावधी हा परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पशा-१/अ.र.रोखीकरण/पो.अधिकारी/११०८३/२०२२ वाशिम दिनांक १४/०९/२०२२ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना सन 2022-2023 या वित्तीय वर्षात 15 दिवस अर्जित रजा पत्यार्पीत करुन रोखीकरणास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी नाव,पदनाम व नेमणुक | रजेचे कारण | रेजेचा तपशिल | वेतनस्तर मधील मुळवेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनि.,राजेश पुरुषोत्तम नारळे,नेमणुक बिनतारी संदेश विभाग,वाशिम | धार्मिक कार्यक्रम | 15 दिवस अर्जित रजा दि.15/09/2022 पासुन 15 दिवस रजा रोखीकरण | रु.72200/- |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आली-३/सिक हजर /नापोकॉ-११९२/११२९८/२०२२/वाशिम दि.१६/०९/२०२२ अन्वये पोना/११९२ ,महेश अशोक वानखेडे नेम.सायबर सेल वाशिम यांची प्रकृती बरी नसल्यामुळे ते दि.०९/०७/०२२ रोजी पासुन आजारी रजेवर होते त्यांची तब्येत बरी झाल्याने ते आज दिनांक १५/०९/२०२२ रोजी मा.अ.पो.अधिक्षक यांचे आंज्ञाकीत कक्षात हजर होणेस आले असता त्यांना त्यांचे विनंतीनुसार हजर करुण घेण्यात येत आहे.तसेच त्यांचा दि.०९/०७/२०२२ ते १५/०९/२०२२ पावेतो ६९ दिवसाचा कालावधी हा अर्जीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

**परवानगी :-निरंक**

**भाग -३**

**बढती :- निरंक**

**पगार :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/मयत स.काम अनिता नखवाल/११०६६/२०२२ वाशिम दि.१७/०९/२०२२ अन्वये सफाई कामगार अनिता गोरु नखवाल जिल्हा वाशिम यांचे दिनांक १०/०४/२०२० रोजी निधन झाले आहे.त्यांचे सेवापुस्त

पडताळणी कामी लेखापडताळणी पथक अमरावती यांच्याकडे पाठविण्यात आले होते.परंतु त्यांच्या सेवापटात सहाव्या वेतन आयोगानुसार करण्यात आलेल्या वेतननिश्चिती मध्ये तफावत असल्याने सदर सेवापट त्रुटीच्या पुर्ततेकामी लेखापडताळणी पथक अमरावती यांच्याकडुन परत आलेले आहे.लेखापडताळणी पथक अमरावती यांनी घेतलेल्या आक्षेपानुसार त्यांची स्तंभ ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात आली आहे.दिनांक ०१/०१/१९९६ ते ०१/०७/२०२० पर्यंत.

या कार्यालयाचे आदेश क्र.पोअवा/पशा-1/सपोनि.पदोन्नती/वेतननिश्चिती/11268/2022/वाशिम दिनांक 16/09/2022 अन्वये मा.पोमस.म.रा.मुंबई यांचे आदेशान्वये पोउपनि ते सपोनि पदोन्नती आदेशान्वये श्री जगदीय मारोतराव बांगर पोउपनि यांची सपोनि पदी पदोन्नतीवर वाशिम जिल्हयात तात्पुरती नेमणुक करण्यात आली आहे.तरी त्यांचे मनावे वेतन नियम 1981 व महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम 2019 दिनांक 20/02/2019 मधील नियम क्र.10 व 13 मधील सुधारीत वेतन मॅट्रीक्स स्तरमधील सेलनुसार पदोन्तीच्या पदावर हजर झाल्याच्या दिनांकापासुन वेतननिश्चिती करण्यात येत आहे. दि.01/07/2022 चे वेतन 51500/-.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-1/सु.वेतननिश्चिती/पोलीस अधिकारी/11282/2022 वाशिम दिनांक 16/09/2022 अन्वये 1.सपोनि/प्रशांत अर्जुन सुबनावळ नेमणुक,पोस्टे.रिसोड.,2.सपोनि/महेश नेमचंद कुचेकर नेमणुक पोस्टे.मानोरा.,3. सपोनि/विजय श्रावण जाधव नेमणुक स्थागुशा वाशिम.,,4. सपोनि/मल्लीकाअर्जुन गोरख वाघमाडे,नेमणुक पोस्टे.कारंजा शहर.,5. सपोनि राहुल तुकाराम गवई., नेमणुक रिसोड यांना यांचे नमुद आदेशान्वये सातव्या वेतन आयोगानुसार झालेल्या वेतननिश्चितीमध्ये अशंत:बदल करुन दि.01/01/2016 पासुन सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

**भाग-४:-**

**बक्षिस :- निरंक**

**भाग -५ :-**

**शिक्षा :-**

पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती या कार्यालयाचे आदेश क्रमांक अप/कक्ष-५/वाशिम /अपिल/अंआ/पोउपनि-आघाव/२०२२/२६३८/अमरावती दि.१५/०९/२०२२ अन्वये पोउपनि/संतोष यादवराव आघाव,नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर,जिल्हा वाशिम यांना पोलीस अधिक्षक वाशिम यांनी आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)पोउपनि संतोष आघाव /अंतिम आदेश/४३३९/२०२१ दि.१३/०७/२०१९ अन्वये पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक ) रोखणे या शिक्षेत अंशत: बदल करुन सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात येत आहे.तसेच भविष्यात त्यांच्याकडुन वरिल कसुरीची पुनरावृत्ती होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी.

पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती या कार्यालयाचे आदेश क्र.अप/कक्ष-५/वाशिम /पोनि-ठाकरे/अंआ/पोउपनि-आघाव/२०२२/२५६७/अमरावती दि.१३/०९/२०२२ अन्वये पोनि/अनिल बापुराव ठाकरे ने.पोस्टे.रिसोड जि.वाशिम यांना उक्त कसुरीसाठी या कार्यालयाचे का.दा.नो.क्र.अप/कक्ष-५/वाशिम/पोनि-अनिल ठाकरे/कसुरी/कादानो/२०/२०२०/२७३७ अमरावती दि.०८/०७/२०२० अन्वये प्रस्तावित करण्यात आलेली पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकारीता (अपरिणामकारक) रोखणे या शिक्षेत अंशत: बदल करुन सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात येत आहे.तसेच भविष्यात त्यांचेकडुन वरील कसुरीची पुर्नरावृत्ती होवु नये याची त्यांनी दक्षता घ्यावी.

पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र अमरावती या कार्यालयाचे आदेश क्र.अप/कक्ष-५/वाशिम /पोनि-ठाकरे/अंआ/पोउपनि-आघाव/२०२२/२५८८/अमरावती दि.१३/०९/२०२२ अन्वये पोनि/अनिल बापुराव ठाकरे ने.पोस्टे.रिसोड जि.वाशिम यांना उक्त कसुरीसाठी या कार्यालयाचे का.दा.नो.क्र.अप/कक्ष-५/वाशिम/पोनि-अनिल ठाकरे/कसुरी/कादानो/२१/२०२०/२७३७ अमरावती दि.२९/०७/२०२० अन्वये प्रस्तावित करण्यात आलेली पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्षाकारीता (अपरिणामकारक) रोखणे या शिक्षेत अंशत: बदल करुन सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात येत आहे.तसेच भविष्यात त्यांचेकडुन वरील कसुरीची पुर्नरावृत्ती होवु नये याची त्यांनी दक्षता घ्यावी.

**निलंबन :- निरंक**

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण:- निरंक**

**ईतर :-**

या कार्यालयाचे आदेश क्र.पोअवा/पशा-2/पोलीस कर्मचारी निवासस्थान वाटप/11040/2022 वाशिम दि.12/09/2022 अन्वये 172 शासकिय निवासस्थान वसाहतीत नमुद पोलीस अंमलदार यांनी त्यांचे विनंती अर्जामध्ये नमुद केलेल्या अडचणीचा विचार करुन त्यांना एक विशेष बाब म्हणुन खालील प्रमाणे निवास्थान वाटप करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचे नाव | नेमणुक | बिल्डींग क्र.व निवास क्र. |
|---|---|---|---|
| 1 | पोशि/२०६,अमोल राठोड | पो.मु.वाशिम | बिल्डींग नंबर 11 क्वॉर्टर न.3 |

तसेच त्यांच्या वेतनातुन दरमहा सेवा शुल्क-135 रुपये व पाणी शुल्क-40 रुपये दरमहा वसुल करण्यात यावे. तसेच त्यांचेकडुन विज डिपॉझिट म्हणुन 1000/- एवढी त्यांचे वेतनातुन समान दोन हप्त्यामध्ये कपात करावी.व वेतनात देय असलेला घरभाडे भत्ता बंद करण्यात यावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/प्रलि-आस्था/३३-क मयत -१२०२,शिंदे/११०५८/२०२२ वाशिम दिनांक १३/०९/२०२२ अन्वये पोशि/१२०२,सचिन रामकृष्ण शिंदे नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर यांचे दिनांक ३१/०८/२०२२ रोजी निधन झ ाले आहे.सदर पोलीस अंमलदार यांचे निधन झाल्याने त्यांचे नांव वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन दि.०१०/०९/२०२२ रोजी पासुन कमी करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/प्रलि-आस्था/ब.नबंर/६४० ऐवजी ४६०/११०७१/२०२२ वाशिम दिनांक १४/०९/२०२२ अन्वये पोशि/४६०,विष्णु देविदास ठाकरे नेमणुक पो.मु.वाशिम यांना वाशिम जिल्हा पोलीस दलाचा ब.क्र.४६० देण्यात आला आहे.परंतु नजरचुकीने संदर्भीय आदेशामध्ये ब.क्र.४६० ऐवजी ६४० करण्यात आला .तरी पोशि/४६० विष्णु देवीदास ठाकरे नेमणुक पो.मु.वाशिम यांचा ब.क्र.६४० ऐवजी ४६० असा वाचण्यात यावा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/प्रलि-आस्था/३३-क/मयत पोलीस अंमलदार/११०९४/२०२२ वाशिम दिनांक १५/०९/२०२२ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास निधन झाले आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचे नाव पदनाम ब.नं | नेमणुक | मयत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पोहवा/९६२,विजय गोविंदराव गायकवाड | पो.मु.वाशिम | ०६/०९/२०२२ |
| २ | पोशि/११०५,संजय सुभाषराव ताले | पोस्टे.कारंजा शहर | १३/०९/२०२२ |

वर नमुद पोलीस कर्मचारी यांचे त्यांचे नावासमोर निधन झाल्याने निधन झाल्याचे दिनांकापासुन त्यांचे नाव वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

( बच्चन सिंह )
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख/पत्रव्यवहार शाखा लिपीक -१/ डिपीजी लिपीक पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक कार्यावाहीस रवाना.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक ३७ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाख प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल व्दारे सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.